स. ग्रं. सं. ...
...षय काव्य
...नं. २५६
१६१७

कल्याणनंदाचीं गाणीं.

REFBK-0001463
REFBK-0001463

प्रकाशक,
श्रीजुम्मादादाव्यायामशाला,
बडोदें.

कुवलयानंदाचीं गाणीं.

श्रीयुत जगन्नाथ गणेश गुणे, बी. ए.,

ऊर्फ

कुवलयानन्द

यांनीं रचिलेलीं.

REFBK-0001463

प्रकाशकः—श्रीजुम्मादादाव्यायामशाला,

बडोदें.

किंमत ४ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
1863

आवृत्ति पहिली, १-२-१९१७.

मुद्रकः—

मणिभाई एम. गुप्त.

आर्य सुधारक प्रेस

बडोदें.

निवेदन.

ती. गुरु.

प्रोफेसर माणिकराव

यांच्या हृदयांत अक्षय्य वाहणारा

शुद्ध प्रेमाचा झरा ज्यांच्या सेवेंत उद्भवला

त्या महात्मा जुम्मादादा यांच्या

पवित्र चरणीं हीं गाणीं

अर्पण केलीं

आहेत.

कुवलयानन्द.

कैवल्यधाम, अमळनेर.

श्रीसद्गुरवे नमः

[उपजाति.]

जे ब्रह्मचर्यें बलभीम लोकीं
यद्बुद्धि पुत्रासम शिष्य लेखी ।
ज्यांच्या यशा लाजत दुग्धसिंधु
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ १ ॥

पटा, बनेटी, लकडी, फिरङ्ग,
बकेत अभ्यासिति जे अभंग ।
आटे बिनोटें परधैर्यसिंधु
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ २ ॥

शार्दूलही, जो उपमान लोकीं
यद्वंद्वयुद्धीं न यशा विलोकी।
न पाहती जे कवणासि निन्दूं
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ ३ ॥

दीर्घ स्वरानें 'पुरुषः शतायुः'।
श्रुती असें सांगत मानवायु।
वयें पहाती तिजलाहि निंदूं
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ ४ ॥

जे जातिभेदा विसरूनि गेले
गुणार्थ ज्यांचें मन कीं भुकेलें।

महंमदीतुल्य जयासि हिंदु
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ॥ ५ ॥

वैराग्य ज्यांचें अति तीव्र लोकीं
हिरण्य मातीसम जें विलोकी।
परोपकारीं रत, विश्वबन्धु
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ ६ ॥

विद्यायशोरूपशरीरयोगें
ज्यांचें जगीं या अमरत्व जागें।
जुम्मामिया छात्रसुखैकसिंधु
कां त्या गुरूंच्या न पदासि वंदूं ! ॥ ७ ॥

श्रीसद्गुरु प्रसन्न

प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुत कवितांचे जनक श्रीयुत ' कुवलयानन्द ' कवि यांचें गद्यांतील नांव **जगन्नाथ गणेश गुणे** असें असून ते मुंबई विश्वविद्यालयाचे एक पदवीधर आहेत. श्रीजुम्मादादाव्यायामशालेचे तर ते एक घटकावयवच आहेत व म्हणून त्यांच्या या चिमुकल्या काव्यमालेच्या प्रकाशनाचें काम या संस्थेनें पत्करिलें आहे. हल्लीं ते अमळनेर येथील " धि खानदेश एज्युकेशन सोसायटी" चे तहहयात सभासद झाले आहेत.

यांचा व आमचा जरी आज बऱ्याच वर्षांचा असा संबंध आहे, तरी त्यांच्या काव्यशक्तीचा परिचय मात्र आम्हांस अगदीं अलीकडेच-म्हणजे गेल्या दोन तीन वर्षांतच—झालेला आहे. कारण, तिचा खरा उदयच निदान

बाह्यतः अविष्करण-याच मुदतींतील आहे. यामुळें हा काव्यसंग्रह अद्याप अल्प आहे व " संग्रह " या नांवास तो अझून योग्य झाला नाहीं, हें आम्हीं जाणून आहों; आणि याच कारणानें कवींच्या मनांतून इतक्यांत तो प्रसिद्ध करण्याचे नव्हते. परंतु हीं काव्यसुमनें सामान्य प्रतीचीं नसून रसिकजनांस तीं आपल्या दिव्य परिमलानें निःसंशय आमोदित करितील अशी आह्मांस खात्री वाटत असल्यानें, या पुष्पांचा मोठा संग्रह होईतोंपर्यंत तीं तशींच पडूं द्यावयाचीं, त्यांचा सौरभ आपणच कायतो घ्यावयाचा व महाराष्ट्रभाषाभिज्ञ रसिकांस त्यांतील मकरंद चाखूं देण्याचें लांबणीवर टाकावयाचें, हें नीतिदृष्ट्या कांहीं अंशीं धोक्याचें तर होणार नाहीं ना? अशी आह्मांस जबरदस्त शंका आली, व या शंकासमुद्रमथनाचेंच प्रस्तुतच्या काव्यरत्नांचें प्रकटीकरण हें फल होय.

कुवलयानन्दांच्या या नूतन बाळकाची ओळख लोकांस करून देणारी ‘ प्रस्तावना ’ ही या सोबत हवी व तींत त्याचें ‘ छायाचित्र ’ ही असावयास हवें, हा विचार नंतर आमच्या मनांत आला. परंतु तें रेखाटण्यास कुशल असा कारागीर कोठून आणावयाचा ? हा प्रश्न पडला. पण मोंत्यें असलीं तर हंसही आणतां येतील, हें तत्व आह्मांस माहीत होतें, व त्यास अनुसरून, जुनागड येथील बहुद्दीन कॉलेजांतील विद्वान् प्रोफेसर, संस्कृत व मराठी वाङ्मयांतील रसिकाग्रणी व आमचे सन्माननीय मित्र **श्रीयुत महादेव मल्हार जोशी, एम्. ए.,** यांस आह्मीं प्रस्तावना लिहिण्यास विनंति केली व त्यांनीं ती लागलीच मान्य केली. या त्यांच्या अनुग्रहाबद्दल त्यांचे आभार येथे मानण्याची जरूरच आहे असें नाहीं; कारण, या काव्यप्रसंगानुरोधानें त्यांचे आमच्याशीं तादात्म्यच झालेलें आहे. तरीपण, शिष्टाचारास अनुसरून आह्मीं ते मानीत आहों. तसेंच श्री बा. मो. चोळकर यांनीं प्रुफें

तपासण्यांत आम्हांस जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहों.

शेंवटीं, ही काव्यमाला सर्व सरस्वतीभक्तांच्या हातीं देत आहोंत, तिचा ते स्वीकार करितील अशी आशा प्रदर्शित करून रजा घेतों.

बडोदें.
॥मिति पौष व. ११॥
शके १८३८

श्री जुम्मादादा व्यायामशाला,
प्रकाशक.

श्रीसद्गुरुदत्तात्रेयप्रसन्न.

' कुवलयानंद ' कवींची कविता मी आज बरेच दिवस फिरून फिरून वाचीत आहे. कवीच्याच अकारण स्नेहाचें हें फळ आहे. कारण त्यांनीं आपली कविता कोणत्याही मासिकांत किंवा वर्तमानपत्रांत छापिली नाहीं. त्यांची कविता वाचून मिलिंदायमान होणारे मजसारखे त्यांचे भक्त त्यांच्या विनयास व शालीनतेस झुगारून देऊन च ही त्यांची कविता छापण्यास तयार झाले आहेत. भक्ति ही थोडीशी आंधळी असतेच. पण सरस्वतीच्या राज्यांत अंध भक्तीला उत्पन्न करणारीं कारणें इतर व्यवहाराइतकीं स्वार्थदूषित खास नसतात. काव्यांतील किंवा चित्रांतील सौंदर्य चाखीत असतां जें सुख होतें तें सद्वर्तनाइतकेंच किंबहुना ज्यास्त च निर्हेतुक व दिव्य असतें असें जर्मन तत्त्ववेत्ता कॅन्ट समजतो. त्या सौंदर्याची किंवा तदुद्भूत

सुखाची मीमांसा कदाचित् कोणाला मुळींच देतां येणार नाहीं; कदाचित् देतां आली तरी ती चुकीची असूं शकेल; कदाचित् मत व रुचि, यांच्या वैचित्र्यामुळें ती मीमांसा सर्वलोकसंमत होणार नाहीं. अशा दृष्टीनें काव्यभक्तीस पाहिजे तर अंध म्हणा. पण या अंधत्वांत स्वार्थाचा किंवा खालच्या दर्जाच्या अर्थकामांचा विटाळ नसल्यामुळें या भक्तीस दूषण तर देतांच येत नाहीं पण निष्काम मातृवात्सल्याप्रमाणेंच तें पुष्कळ अंशीं भूषण-रूप व उदात्त असें आहे असें कबूल करणें भाग आहे. प्रथम वाचनांतच या कवीच्या कवितेनें मला गुंग केलें. फिरून फिरून वाचल्यानंतर गुंगी जाऊन विचारशक्ति जागृत होऊं लागली. पण विचारशक्तीनें भक्ति कमी न होतां ज्यास्तच वाढली; तेव्हां 'कालेनावरणात्यये परिणते यत्स्नेहसारे स्थितं' हीच भवभूतीची उक्ति दांपत्याद्वैतक्षेत्रांतच नव्हे, तर कविता व वाचक यांच्या अद्वैत संबंधांतही खरी आहे, याचा अनुभव आला. हेंच

काव्यप्रेमरसाचें सुख सर्व महाराष्ट्रवाचकांस दिल्यानें पतिपत्नीच्या अद्वैताप्रमाणें ईर्ष्या, असूया किंवा पाप यांचा या अद्वैतांत गन्धही असण्याचा संभव नाहीं, म्हणून ' कुवलयानंदां ' च्या काव्यज्योत्स्नेच्या कांहीं शीतल धारा या पुस्तकाच्या गवाक्षांतून महाराष्ट्र वाचकांकडे धाडीत आहों. अव्हेर होणार नाहीं इतकेंच नव्हे, तर एकदां या अमृतधारांचें स्पर्शसुख मिळाल्यावर वाचक आपलीं चित्तगवाक्षें कायमचीं उघडून ठेवितील व धारांचा वर्षाव सतत मिळावा अशी इच्छा करितील अशी माझी खात्री आहे.

भक्ति थोडीशी अंध असते हें वर म्हटलेंच आहे. पण त्या अंधत्वासही काळाची व स्थळाची मर्यादा असतेच. आपल्या प्रियवस्तूचे गुण दुसऱ्यास सांगतांनां नुसतें ' किती सुंदर आहे!' ' किती मधुर आहे!' या अंधत्वदर्शक पालुपदानें अंधभक्तांचाही संतोष होत नाहीं. त्याला दुसऱ्याची खात्री करण्याकरितां तर्कशक्तीचा व गुणमीमांसे-

चा आधार घ्यावाच लागतो. व गुणाची मीमांसा करण्याला आरंभ केला कीं शेवटीं त्याच मीमांसेला शंकराच्या तृतीय नेत्राप्रमाणें दोषदर्शक तिसरा डोळा उत्पन्न झालाच पाहिजे. भक्तिगंगेच्या धारांनीं त्याची ज्वाला थोडीशी विझूं शकेल. पण तो सर्वस्वी मिटणें अशक्य आहे. याच मीमांसेचें ही प्रस्तावना हें फळ आहे. ती सर्वजनसंमत होणें अशक्य आहे. पण ती वाचून नंतर कवीची कविता वाचल्यावर कांहीं सौंदर्यस्थलांविषयीं ऐकमत्य झालेंच पाहिजे अशी माझी खात्री आहे.

प्रसंगानुसार काव्याच्या लक्षणाविषयीं थोडा विचार करणें योग्य दिसतें. म्हणजे प्रस्तुत कवितांची मीमांसा करणें बरेंच सोपें जाईल. ‘ रसात्मकं काव्यं ’ हें लक्षण सर्वांत सुटसुटीत व आधुनिकांस पसंत पडेल असें आहे. हें लक्षण कुवलयानंदांच्या कवितेस चांगलेंच लागू पडतें. मात्र ‘ रस ’ या शद्बाच्या अर्थांत शृंगार, हास्य, करुण इत्यादि प्राचीन संस्कृतसाहित्यकारांच्या पारिभाषिक

रसांचाच अंतर्भाव न करितां जरा ज्यास्त व्यापक रीतीनें मनुष्याच्या मनोगत सर्व भावनांचा त्यांत अंतर्भाव केला पाहिजे. कुवलयानंदांचीं काव्यें इतकीं भावनामय आहेत कीं त्यांचा पाय पृथ्वीवर आहे कीं नाहीं याचाच संशय येतो. हा संशय जरा सूक्ष्म रीतीनें वाचणाराचे मनांत फार वेळ राहत नाहीं. कारण कुवलयानंदांचा काव्यमय स्वर्ग किंवा दिव्यजीवित सर्व विश्वांत प्रकाशित होत आहे. मग पृथ्वी ही विश्वांतच असल्यामुळें तिच्यावरच ते बहिष्कार काय ह्मणून घालितील ? त्यांच्या काव्यनिर्मित ' बाळीं ' ची ' रांगोळी ' (पान २२) सर्व विश्वांत घातली जात आहे. व मूळची रांगोळीची कल्पना इतकी घरोब्याची व पृथ्वीवरील माणसांच्या रोजच्या परिचयांतली आहे कीं ते पृथ्वीलाच मध्य-बिंदु कल्पून तेथूनच मूळास न सोडितां सर्व विश्वाचा परीघ व्यापून टाकीत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कित्येक कवि दिव्य कल्पनांना दिव्य परंतु अपरिचित अशा शब्दांचाच पोषाख

देतात. त्यांच्या कविता-देवीचे अलंकार ही उज्ज्वल असतात. परंतु वाचकांस अपरिचित भासतात. हा दोष प्रस्तुत कवितांस कधींही लाविता येणार नाहीं. या कवीच्या प्रतिभेची व तज्जन्य कवितेची भरारी मुलांच्या पतंगाच्या भरारीप्रमाणेंच कवीच्या परिचित पृथ्वीला एका सूक्ष्म रज्जूनें चिकटलेली असते. तींतील उच्चभावना फुलांच्या सुगंधा प्रमाणें ध्वनिरूपानें बाहेर दरवळतातः पण फुलें रोजचींच व त्यांचा रंग रोजचाच. सुगंध मात्र अनाघ्रातपूर्व व दिव्य. या गुणामुळच या कवीची कविता इतकी उदात्त असून सर्वलोकप्रिय होण्याचा संभव ज्यास्त आहे. साधेपणा, घरोब्याचा परिचय, व भावनांचें उदात्त गांभीर्य, असा 'सर्वो गुणानां गणः' वाचकांच्या भाग्यामुळें या कवितेंत 'समुदित' झाला आहे या ह्मणण्यांत थोडी अतिशयोक्ति असली, तरी ती वस्तुस्थितीवरच अधिष्ठित झाली आहे असें कबूल करावें लागेल.

खऱ्या उदात्त कवितेंत नवनवोन्मेषशालिनी किंवा

नव्यानव्या कल्पनांच्या उकळ्या जींत फुटतात अशी प्रति-भा चमकत असते हें लक्षण जरी आपण घेतलें तरी प्रति-क्षणीं नवे भासणारे असे यांच्या काव्यकारंजांतून उडणारे फवारे शोधावयास फार लांब जाणें नको. वर निर्दिष्ट केले-लें 'रांगोळी' (पान २२) हें, व 'माझें वेड' (पान २८) हें, अशीं दोन काव्यें जरी घेतलीं तरी प्रत्येक सुटच्या पदां-शांतच केवळ नव्हें, तर प्रत्येक ओळींत नवी नवी कल्पना गुंफून कवीनें स्वतःच अद्भुत तऱ्हेची शब्दार्थमय रांगोळी काढून दाखविली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सर्व विश्वाचें गूढ उकलून सृष्टि, मनुष्य, व ईश्वर या त्रिपुटीचें ऐक्य अशा रीतीनें घडवून आणवयाचें कीं या तीन पदार्थांपैकीं कोणाचें ही वैशिष्ठ्य नाश पावणार नाहीं व तत्त्वज्ञान्याला जी गोष्ट तर्कपद्धतीनें सिद्ध करतां येत नाहीं ती प्रतिभेच्या आनुभाविक ज्वालेनें वाचकांच्या मनांवर लख्ख प्रकाशित करावयाची हें महत् कृत्य कवीच्या हातूनच घडतें अशी आज सार्वत्रिक

समजूत आहे. हें महत्कृत्य या कवीनें या चिमुकल्या काव्यसमूहांत केलें आहे असें म्हणणें धाष्टर्याचें आहे हें कोणीही कबूल करील. पण या कवीची प्रतिभा हें महत्कृत्य हातीं घेण्यास सर्वथैव समर्थ आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास लागणारी सामुग्री बीजरूपानें या काव्यसमूहांत आहे हें म्हणणें अतिशयोक्तीचें खास नाहीं.

अगदीं पहिलीच कविता ' श्रीराम, ' व ' चित्कला ' (पान ३९) ' चैतन्याचा गाभा ' (पान १८), ' कालचक्राचे फेरे ' (पान ४८) या कविता, सृष्टि, मनुष्य व ईश्वर यांचें छत्तीसगुणी लग्न जुळविण्यांत हे काव्यसृष्टिचे ज्योतिषी—किंवा ब्रह्मदेव म्हटलें तरी हरकत नाहीं—गुंतले आहेत हें सिद्ध करण्यास बस आहेत. सृष्टीच्या भयंकर संहाराचें व कलहाचें स्वरूप बरोबर ध्यानांत आणून, मनुष्यकृत युद्धादि भयंकर उत्पातांचें मनन करून व प्रारब्ध किंवा दैव यांच्या विचित्र लीलांचें सूक्ष्म अवलोकन करून मग ' अमंगल्यं शीलं तव भवतु नामैव-

मखिलं । तथापि स्मर्तॄणां वरद परमं मंगलमसि ' । या महिम्नकाराच्या उसळीनें सर्व विश्वास मंगल व अद्वैत-रूप देण्याचें सामर्थ्य दाखविण्याइतकें ' परिणतप्रज्ञत्व ' या कवीस आज आलें नाहीं हें स्पष्ट आहे. पण यांच्या-पाशीं ' काव्यप्रकाश ' कारांनी वर्णन केलेल्या ' शक्ति ' किंवा ' प्रतिभा ' या गुणाचा निधि चांगलाच आहे हें कबूल करणें भाग आहे. त्या परिणतप्रज्ञत्वाच्या सिद्धी-करितां अभ्यास, सूक्ष्म अवलोकन, व निदिध्यास या साध-नत्रयीचें अवलंबन त्यांनीं केलेंच पाहिजे या उपदेशास ते पात्र आहेत इतकें म्हणणें दोषैकदृष्टीच्या टीकाकारास-ही कबूल करावें लागेल.

'प्रेममय व्हावें। प्रेमानें जग जिंकावें, ' या प्रेमाच्या गाण्यांत (पान ४०) त्यांनीं सृष्टीच्या ' जीवो जीवस्य जीवनं ' अशा स्वरूपाच्या कलहाला कोठें जागा राखून ठेविली आहे हें कळत नाहीं व या कलहाच्या गोंगाटानें ' ब्रह्मानंदीं टाळी पडतां । आप आपणांलागीं बघतां ।

आत्यंतिक सुख तें अनुभवितां । रम्य जी भासे, ती सकल चित्कला विलसे ॥ (पान ३७) या कडव्यांत वर्णन केलेली कवीची समाधि भंग पावेल किंवा नाहीं हें सांगतां येणें कठिण आहे. पण या कलहाची आठवण देखील न होण्याइतकी निर्विकल्प समाधि कवीला साधली आहे हें निश्चित आहे. कवीचा अभ्यास पूर्ण झाल्यावर या भक्कम पायावर त्यांनां तत्वज्ञानात्मक भव्य मजले व सुंदर मनोरे खास बांधतां येतील, अशी अटकळ आज बांधण्यास हरकत नाहीं. म्हणूनच या पायाच्या कांहीं घडीव दगडांचे मासले लोकांपुढें ठेवणें युक्त आहे. लोकां कडून गुणग्रहण होऊन उत्तेजन मिळाल्यास पुढील इमारत खास भव्य व सुंदर होईल असें या लेखकास तरी आज वाटत आहे.

या काव्यसमूहांत एकाच चालीचीं पदें पुष्कळ आहेत.

तसेंच विचारांची दिशाही थोडी एकतानतेची आहे. पण कवीचा मानसिक प्रवासच अजून पुष्कळ व्हावयाचा असल्यामुळें स्थलप्रसंगवर्णनें व विचारांचीं उड्डाणें विविध व उदात्त होण्याला अजून बराच अवकाश आहे. पण कवीचें विमान व विचारनौका हीं उच्च दर्जाचीं व शाबूत आहेत; अवलोकनशक्ति व अंतरंगप्रवेशनिपुणता, हीं सूक्ष्म व दूरपल्याचीं आहेत हें ही विधान वाचकांस काव्यास्वाद घेतल्यावर पटेल असें वाटतें.

इतकी प्रस्तावना कवीची व वाचकांची ओळख करून देण्यास बस आहे. शेवटीं या कवीकडून एका मागून एक अशींच काव्यें निर्माण व्हावीं, त्यांचें रसिक वाचक-वृंदांकडून गुणग्रहणपूर्वक चीज व्हावें, व कवीची कीर्ति-मंदिरांत उच्च पीठावर स्थापना झालेली या डोळ्यांनीं

पहावी अशी सच्चिदानंदरूपप्रभूस प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

बहाद्दिन कॉलेज,
जुनागड.
मकरसंक्रांत शके १८३८.
तारीख १४ जानेवारी,
सन १९१७.

महादेव मल्हार जोशी.

अनुक्रमणी.

	गाणें.	पृष्ठ.
१	श्रीराम.	१
२	वन देवता.	७
३	उषा.	१४
४	चैतन्याचा गाभा.	१८
५	चांदणी.	२०
६	रांगोळी.	२२
७	फुलपांखरूं.	२५
८	माझें वेड.	२८
९	प्रतिभेचा खेळ	३१
१०	चित्कला.	३५
११	जळदेवतेचें गाणें.	३८
१२	प्रेम....	४०
१३	सौख्याचा सागर.	४२
१४	संध्यादेवी.	४४
१५	कालचक्राचे फेरे...	४८
१६	रम्यवाटिका.	५०
१७	ईशलीलेचीं काव्यें.	५५
१८	प्रतिभेची आरती.	५७
	उल्लेख	५९

श्रीराम.

चालः—जाउं नकारे विषयाटविची वाट कठिण मोठी।

भक्तवत्सला करुणावन्ता
दुःखितविश्रामा ।
रामा मूर्ती तव न दिसे मज
का मङ्गलधामा ॥ २ ॥

प्रतिरात्रीं तव नीलवर्ण हा
रत्नजडित शेला ।
नभःप्रदेशीं दिसतो मज जो
व्यापुनि जग ठेला ॥ ४ ॥

रौप्यतन्तुंनीं झगझगणारा
तशाच वर्णाचा ।
मिरविशि दिवसां शेला दिसतो
तो मजला साचा ॥ ६ ॥

शेला दिसतो, मग तव मूर्ती
कां न दिसे रामा ।
भक्तवत्सला करुणावन्ता
सन्मङ्गलधामा ॥ ८ ॥

बीज उगवतां सन्ध्यादेवी
अभिनवपुष्पांहीं ।
पूजितसे तव चरणांलागीं
सायंकाळीं ही ॥ १० ॥

पूजासमयीं दिसतें मज तव
नख अङ्गुष्ठाचें ।
मूढ लोक हे वन्दन करिती
चन्द्र ह्मणुनि ज्याचें ॥ १२ ॥

पूजा घेउनि परतासि तेव्हां
पुष्पें तव पदिंचीं ।
नभःप्रदेशीं विस्कळलेलीं
दिसतीं मज साचीं ॥ १४ ॥

पुष्पें दिसतीं, नखही दिसतें
शेलाही रामा ।
मग तव मूर्ती न दिसे कां मज
सन्मङ्गलधामा ॥ १६ ॥

स्वारी निघतां वर्षाकाळीं
    रामा तव मार्गी ।
मेघ संभ्रमें नभीं उभविती
    तोरण बहुरंगी ॥ १८ ॥

डंका गर्जे, पताक चमके
    तव ही अभिरामा ।
भक्तवत्सला करुणावन्ता
    दुःखितविश्रामा ॥ २० ॥

पताक दिसते, तोरण दिसतें
    मजला श्रीरामा ।
मग तव मूर्ती न दिसे कां मज
    सन्मङ्गलधामा ॥ २२ ॥

हृदयमन्दिरीं सत्त्वगुणाचें
सिंहासन रचिलें ।
सत्सङ्गतिसत्संकल्पांच्या
रत्नांहीं खचलें ॥ २४ ॥

सिंहासनिं त्या अवलोकावी
मूर्ति तुझी वाटे ।
प्रेमरसाचें भरतें येई
नयनीं जल दाटें ॥ २६ ॥

तिथें सावली तुझी दिसे गा
सखया श्रीरामा ।
मग तव मूर्ती न दिसे कां मज
सन्मङ्गलधामा ॥ २८ ॥

*　　　*　　　*

विश्व कडाडें ! ज्वाळ भडाडे !
　　दृष्टी मम दिपली ! ।
त्रैलोक्याच्या सम्राटाची
　　स्वारी ही आली ! ॥ ३० ॥

बैस आसनीं, ऐके गाणीं
　　सखया श्रीरामा ।
भक्तवत्सला करुणावन्ता
　　सन्मङ्गलधामा ॥ ३२ ॥

पूर्णिमेच्या रात्रीं चार वाजण्याचा सुमार. चन्द्र पश्चिम क्षितिजाकडे बराच झुकला होता. शुक्राची चांदणी नुक्तीच उगवून पूर्वेकडे चमकत होती. अशा थंड व शांत वेळीं मनुष्यवसतीपासून फार दूर असणाऱ्या कुरणांत फिरत असतां वनदेवतांस पहातांच तन्मय होऊन गाऊं लागलेल्या कवीचें गाणें पुढील हृद्विलासांत [Lyric] दिलें आहे.

वनदेवता.

चाल:—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

※ वनदेवतांस पाचारण. ※ ※

गाया माणीं । या ग या ग या साजणी ॥
ध्रु० प० ॥

रात्रिशान्ति या बहिणीबहिणी ।
लागुनि तरुराईच्या कानीं ।
हसती बहु गुजगोष्टी करुनी ।
हिरव्या कुरणीं । या ग या—॥ १ ॥

दीप आपुला आकाशींचा ।
अंधुक जों नच झाला साचा ।

तोंवरि खेळूं खेळ मजेचा ।
हिरव्या कुरणीं । या ग या—॥ २ ॥

लावण्याची मूस ओतली ।
ती ही सिंहासनीं बैसली ।
राणी पूर्वेकडे आपली ।
हिरव्या कुरणीं । या ग या—॥ ३ ॥

नवरत्नांचा सडा शिंपिला ।
पुष्पांवरि हा कवणें असला ।
हळूं ! ढका नच लावा त्याला ! ।
हिरव्या कुरणीं । या ग या—॥ ४ ॥

दक्षिणचा हा वारा सुटला ।
वेलीसंगें करितो लीला ।

मङ्गल याचें चिन्तायाला ।
हिरव्या कुरणीं । या ग या—॥ ५ ॥

* वनदेवता येतात. *

कोमल पल्लव नेसुनि कोणी ।
पुष्पभरानें कोणी सजुनी ।
फुलवेलींच्या जाळ्यांमधुनी ।
माझ्या भंवता । किति जमल्या वनदेवता ।
बघतां बघतां । किति जमल्या वनदेघता ॥६॥

चम्पकलतिका गोड चमेली ।
गुलाब सर्वांपुढें मिरवली ।
जाइजुईची स्वारी आली ।

माझ्या भंवता । किति जमल्या वनदेवता ।
बघतां बघतां । किति जमल्या वनदेवता ॥७॥

* वनदेवता गातात. *

कांहीं खेळूं फुगड्या येथें ।
कांहीं घालूं पिंगा तेथें ।
सर्वहि गाऊं मंजुळ गीतें ।
हिरव्या कुरणीं । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ।
बहिणीबहिणी । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ॥८॥

तरुराईच्या माण्डीवरती ।
निर्झरबाळें सुखें क्रीडती ।
जवळीं बसुनी नानारीतीं ।

गातों गाणीं । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ।
बहिणीबहिणी । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ॥९॥

भडके उठती दुःखाग्नीचे ।
मानवहृदयीं तेव्हां साचे ।
पाडुनि पाउस आनन्दाचे ।
गातों गाणीं । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ।
बहिणीबहिणी । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ॥१०॥

धागे काढुनिया प्रेमाचे ।
बन्द बांधुनी वात्सल्याचे ।
विणितां पट हे संसाराचे ।
गातों गाणीं । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ।
बहिणीबहिणी । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ॥११॥

सदैव लेउनि शालू हिरवा ।
गन्ध वाटितों सकलां बरवा ।
सुखवायातें जगतीं सर्वा ।
गातों गाणीं । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ।
बहिणीबहिणी । आह्मि विश्वाच्या मैत्रिणी ॥१२॥

उषा.

चालः—बाळा जो जो रे ।

रात्रींतुनि फुलला । पुष्पांचा ।
मण्डप आकाशाचा ।
तीं पुष्पें घ्याया । गुंफाया ।
हार, तनू सजवाया ।
दिव्य उषा आली । वेल्हाळी ।
ल्याली साडीचोळी ।
कोऱ्या भरजरिची । सोन्याची ।
परडी त्या बाळीची ।

परि मज देखोनी। हळुं हसली।
चुंबुनिया मज घाली।
त्या परडीमाजी। मग हलवी।
गाणें गाउनि रिझवी।
'बाळा प्रेमाचा। तूं साचा।
ठेवा आनन्दाचा।
बैसुनि रसिकांचे। तूं हृदयीं।
गाउनि झोले घेई।
पाजी सकल जनां। ज्ञानाचा।
पेला ब्रह्मरसाचा॥ बाळा प्रेमाचा'–॥१॥
परिसुनि हें गाणें। जग भुललें।
सकलहि तन्मय झालें।

पञ्च महाभूतें । जड पहिलीं ।
तींहि सचेतन झालीं ।
पक्षिकुळें उठलीं । मग सगळीं ।
गातीं एक्या मेळीं ॥ 'बाळा प्रेमाचा'—॥२॥

दिव्य उषा गातां । आनन्दें ।
सकल चराचर कोंदें ।
पुष्पें मोहुनिया । पटपट तीं ।
परडीमाजी पडतीं ।
उज्ज्वल तेज उषा । परडीही ।
उज्ज्वल कुसुमें नव हीं ।
मीही तेजाळ । तेजाळ ।
ब्रह्माण्डाचा गोळ ।

तेज जगीं भरलें। समरसलें ।
तेथें मीपण कुठलें ।
कवणें कवणाला । रिझवावें ।
मधुररवानें गावें ॥ ‘ बाळा प्रेमाचा ’—॥३॥

मराठी ग्रंथ
ता.
ठाणे

चैतन्याचा गाभा.

चालः—असा धरि छंद। जेणें तुटेल हा भवबंध. ॥

लोल तेजाचा। गाभा मी चैतन्याचा ॥ ध्रु० प० ॥

अनन्तसूर्यीं अम्बर भरलें।
विश्वकपाटीं तेज फुंजलें।
परि मम पोटीं तें मावळलें।
लोल तेजाचा। गाभा मी चैतन्याचा ॥ १ ॥

वीज कडाडे, विश्व तडाडें।
दशदिक्प्रान्तीं ज्वाळ भडाडे।
खद्योतासम तीहि मजपुढें।
लोल तेजाचा। गाभा मी चैतन्याचा ॥ २ ॥

काव्यमन्दिरीं प्रतिभावाळी ।
मिरवी, तेजें भूतळ उजळी ।
मम कोटयंशें परि ती सजली ।
लोल तेजाचा । गाभा मी चैतन्याचा ॥ ३ ॥

आनन्दचि आनन्दा कवळी ।
सत्तेतें सत्ता कवटाळी ।
मजमधिं न उरे अन्य उमाळी ।
लोल तेजाचा । गाभा मी चैतन्याचा ॥ ४ ॥

चांदणी.

चालः—गवळण करिते न्हाणधुणं । उद्यां बाजारासी जाणं ॥

कविहृदयींची प्रियकर राणी ।
चकचक मी चांदणी ॥ ध्रु० प० ॥

अदृश्यचित्रीं जग हें भरलें ।
अनाहतध्वनिनें दुमदुमलें ।
कविसी म्यां तें गोचर केलें ।
चकचक मी चांदणी । कवि—॥ १ ॥

अपार ऐशा कालसागरीं ।
दिवसरात्रि या फिरती लहरी ।

क्रीडा करितें त्यामाझारीं ।
चकचक मी चांदणी । कवि—॥ २ ॥

अनन्तविश्वाच्या उदरीं तें ।
तारामण्डळ गरगर फिरतें ।
त्यामधिं बैसुनि झोले घेतें ।
चकचक मी चांदणी । कवि—॥ ३ ॥

रांगोळी.

चालः—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

कुरणामाजी सुमनें फुललीं ।
नानारङ्गीं मण्डित झालीं ।
रङ्ग कशाचे! सुमनें कुठलीं!! ।
सृष्टीबाळी । घालितसे ही रांगोळी ।
तृणाङ्कुरपटलीं । घालितसे ही रांगोळी ॥ १ ॥

सविता गेला अस्तमयाला ।
नक्षत्रांचा संघ चमकला ।
कुठल्या नक्षत्रांच्या माळा ! ।

रात्रीबाळी । घालितसे ही रांगोळी ।
नभाचे पटळीं । घालितसे ही रांगोळी ॥ २ ॥

प्रभात झाली, अरुण उदेला ।
ध्वज सूर्याचा दिसूं लागला ।
ध्वज नोहे हा ! अरुणहि कुठला !! ।
प्राचीबाळी । घालितसे ही रांगोळी ।
नभाचे पटळीं । घालितसे ही रांगोळी ॥ ३ ॥

पद्य गायकें नवरस ह्मटलें ।
विकार हृदयीं नवविध उठले ।
पद्य कशाचें ! विकार कुठले !! ।
कविताबाळी । घालितसे ही रांगोळी ।
रसिकहृत्पटळीं । घालितसे ही रांगोळी ॥ ४ ॥

कविहृद्यांतरिं ऊर्मी उठली ।
काव्यकल्पना नाना व्याली ।
काव्य कशाचें ! ऊर्मी कुठली ! ! ।
प्रतिभाबाळी । घालितसे ही रांगोळी ।
सुकविहृत्पटळीं । घालितसे ही रांगोळी ॥ ५ ॥

फुलपांखरूं.

चालः—गवळण करिते न्हाणधुणं । उद्यां बाजारासी जाणं ।।

सुखमय जग हें ! मौजा मारूं ।
मी तों फुलपांखरूं ।। ध्रु० प० ।।

सुगन्ध वायू शीतल वाहे ।
फुलवेली ही डोलत राहे ।
पुष्पमधूवरि बसलें मन हें ।
मी तों फुलपांखरूं । सुखमय—।। १ ।।

शेताभंवती कुंपण रचिलें ।
वेल फळांहीं तेथें खचले ।

विहरायातें ते मज रुचले ।
मी तों फुलपांखरूं । सुखमय—॥ २ ॥

उन्हांत कवळ्या क्षणभर उडतों ।
सावलीमधें भिरभिर फिरतों ।
सदैव आनन्दानें खुलतों ।
मी तों फुलपांखरूं । सुखमय—॥ ३ ॥

(मन्दाक्रान्ता.)

कोठें वायू सुखकर ! कुठें
सांग त्या धन्य वेली ! ।
कोठें सूर्यें रुचिरकिरणीं
वाटिका रम्य केली ! ॥

मातें वाटे विष हृदयिंचें
ओकुनी मानवानें ।
केली सारी विषमय धरा
दाटली ही तमानें ! ॥ ४ ॥

माझें वेड.

चालः—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

दिव्य सुख घ्यावें । मज वाटे वेडें व्हावें ॥
ध्रु० प० ॥

वसन्त येतां कुसुमें फुलुनी ।
पसरे सुगन्धं रानोरानीं ।
तया सुगन्धामाजी भरुनी ।
गमे हिंडावें ॥ मज वाटे—॥ १ ॥

पूर्ण चन्द्र हा दिसे अंबरीं ।
याचीं किरणें पडलीं भूवरि ।
त्यांचें विणुनी वस्त्र रुपेरी ।
गमे तें ल्यावें । मज वाटे—॥ २ ॥

सरोवरींच्या शांतजलावरि ।
झुळुक लागतां उठती लहरी ।
हळूंच शिरुनी त्यांमाझारीं ।
गमे खेळावें ॥ मज वाटे—॥३ ॥

सलिलबिंदु हे कमलावरती ।
मौक्तिककान्ती इथें मिरविती ।
बिसतन्तूनीं नानारीतीं ।
हार गुंफावे ॥ मज वाटे—॥ ४ ॥

रात्रीं नभ मेघांनीं भरलें ।
त्यांमधिं चंचल चपला खेळे ।
सुवर्णरेषाजाल उमटलें ।
गमे तें घ्यावें । मज वाटे—॥ ५ ॥

कालिदास–भवभूती साचे ।
कविकुलगुरु जे असती त्यांचे ।
हृदयीं भरुनी प्रेमरसाचे ।
घुटके घ्यावे । मज वाटे– ॥ ६ ॥

प्रौढपणा मज न रुचे चित्तीं ।
पुन्हां खेळणें घेउनि हातीं ।
सरस्वतीच्या अंकावरती ।
गमे खेळावें । मज वाटे– ॥ ७ ॥

पूर्णिमेच्या चांदण्यांत चन्द्र मधोमध आला असतां उघड्यावर निजणाऱ्याच्या चित्तवृत्ति अगदीं तल्लीन होऊन जातात. त्यांतल्यात्यांत तो जर रसिक असेल तर तो जड सृष्टि लवकरच विसरतो, व त्याच्या हृदयाच्या रंगभूमीवर चिन्मय प्रतिभेचे खेळ सुरू होतात. पुढील हृद्विलासांत [Lyric] अशा एका खेळाचें वर्णन दिलें आहे. त्यांत रसिकास प्रतिभेचें तान्हुलें ह्मटलें आहे, हें निराळें सुचविणें नलगे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रतिभेचा खेळ.

[**चाल**—जाउं नका रे विषयाटविची वाट कठिण मोठी ॥]

तेजोमय हें विश्व पसरलें
तयाचिया पोटीं ।
खेळ खेळते आजि चिन्मयी
प्रतिभा हे गोरटी ॥ ध्रु० ॥ १०॥

धरणीचा हा गोळ नव्हे जड,
निजवाया तान्हा ।
ब्रह्माण्डाच्या उदरिं टांगिला
प्रतिभेनें पाळणा ॥ २ ॥

चन्द्र नव्हे, खेळणें मजेचें
त्यावरती टांगिलें ।
हातपाय नाचवी बघुनि त्या
प्रतिभेचें तान्हुलें ॥ ४ ॥

दिव्यमण्यांचे दीप उजळिले
निळ्या छताखालीं ।
हर्षें उसळें बाळ बघुनि त्या
स्मित विलसें गालीं ॥ ६ ॥

१५६३

सप्तर्षींची फिरकी केली
ध्रुवदण्डाभंवती ।
स्वर्गङ्गेच्या पवनें फिरतां
हर्षे बाळ किती ! ॥ ८ ॥

बाळ हर्षतां हर्षें भरली
ती प्रतिभाबाळी ।
हसली दिसली सत्त्वगुणमयी
प्रेमाची पुतळी ॥ १० ॥

तिचें हास्य हें विश्व धवळवी
नोहे हें चांदणें ।
प्रतिभेचा हा खेळ, नव्हे
जड सृष्टीचें नांदणें ॥ १२ ॥

तेजोमय हें—॥

चित्कला.

चालः—असा धरि छंद। जेणें तुटेल हा भवबंध ॥

रम्य जी भासे। ती सकल चित्कला विलसे ॥
ध्रु० प० ॥

नभोमण्डळीं अभ्रपटावरि ।
सुरधनु काढी सविता स्वकरीं ।
लोभवि मन, परि त्यामाझारीं ।
रम्य जी भासे। ती सकल–॥ १ ॥

दिव्य उषेचा हा कण्ठमणी ।
शुक्र विराजे निश्चलगगनीं ।
हर्षवि नयनां परि त्या स्थानीं ।
रम्य जी भासे। ती सकल–॥ २ ॥

आम्रमंजरी चाखुनी हृदयीं ।
धाला कोकिल पञ्चम गाई ।
श्रवण तोषवी, परि त्या ठायीं ।
रम्य जी भासे । ती सकल-॥ ३ ॥

वापीमाजीं कमलें फुललीं ।
त्यांवरि अलिकुल रुंजी घाली ।
रिझवी मन, परि ऐशा कालीं ।
रम्य जी भासे । ती सकल-॥ ४ ॥

प्रियतनयातें धरितां हृदयीं ।
अमृतसेक जणुं तनुतें होई ।
हृदय खळबळें, परि त्या ठायीं ।
रम्य जी भासे । ती सकल-॥ ५ ॥

दिव्य नाद हे पडती श्रवणीं ।
रूपें दिव्यहि दिसतीं नयनीं ।
उन्मन होई, परि त्या स्थानीं ।
रम्य जी भासे । ती सकल-॥ ६ ॥

ब्रह्मानन्दीं टाळी पडतां ।
आप आपणालागीं बघतां ।
आत्यंतिक सुख तें अनुभवितां ।
रम्य जी भासे । ती सकल-॥ ७ ॥

जळदेवतेचें गाणें.

चालः—बाळा जो जो रे ।

जो जो जळबाळा । वेल्हाळा ।
निज निज निज रे विमळा ।। ध्रु० प० ।।

पुष्पलता डोले । मन्दगती ।
तेणें कुसुमें हलतीं ।
त्या कुसुमांमाजी । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे ।। जो जो–।। १ ।।

गजगतिनें चाले । गृहदेवी ।
कुंभ कटीवरि ठेवी ।
त्या कुंभामाजी । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे । जो जो–।। २ ।।

गगनीं पवनानें । हळुं हलती ।
नवमेघांच्या पंक्ती ।
त्या मेघांमाजी । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे ॥ जो जो-॥ ३ ॥

रविशशि दोहिंकडे । गगनीं ही ।
हलविति पृथिवी पाही ।
त्या पृथ्वीवरती । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे ॥ जो जो-॥ ४ ॥

प्रेम.

चालः—असा धरि छंद। जेणें तुटेल हा भवबंध. ॥

प्रेममय व्हावें । प्रेमानें जग जिंकावें ॥ ध्रु० प० ॥

वाटे सर्प गळां रुळवावा ।
किंवा धरुनि करीं चुंबावा ।
कोमलहस्तें कुरवाळावा ।
सर्पमय व्हावें ॥ प्रेमानें जग—॥ १ ॥

गोंजरावें कीं सिंहाला ।
झेलावें करिं तच्चरणाला ।
आलिंगावें प्रियवत्साला ।
सिंहमय व्हावें ॥ प्रेमानें जग—॥ २ ॥

सूर्यकिरण हे नयनीं घ्यावे ।
तेज तयांचें हृदिं पाडावें ।
बिंब जाउनी करिं कवळावें ।
सूर्यमय व्हावें ॥ प्रेमानें जग-॥ ३ ॥

नीलवर्ण हें नभ उंचावें ।
वाटे स्वकरें त्या स्पर्शावें ।
सूक्ष्म होउनी त्यांत रिघावें ।
नभोमय व्हावें ॥ प्रेमानें जग-॥ ४ ॥

तृणांकुरांमधिं हिरवें व्हावें ।
लताकिसलयीं कीं डोलावें ।
प्रतिभेला नयनीं निरखावें ।
काव्यमय व्हावें ॥ प्रेमानें जग-॥ ५ ॥

सौख्याचा सागर.

चालः—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

खेदलव नुरला । सौख्याचा सागर भरला ॥ध्रु० प०॥

बाळ भुकेलें बहुकाळाचें ।
रडतां, धांवुनि माय तयाचें ।
चुंबन घेतां मुखकमलाचें ।
पान्हा फुटला ॥ सौख्याचा सागर—॥ १ ॥

गेला निजपति परदेशाला ।
बहुतां दिवसां कागद आला ।
क्षेम तयांतिल कळतां सतिला ।
कण्ठ गद्गदला ॥ सौख्याचा सागर—॥२॥

प्राणान्तक संकट ओढवलें ।
त्यांतुनि मित्रें प्राण रक्षिले ।
दृष्टीं पडतां अश्रु लोटले ।
हृदयीं धरिला ॥ सौख्याचा सागर-॥३॥

ध्यान कराया भक्त बैसला ।
ध्येया बघण्या आतुर झाला ।
मुरलीधर वनमालावाला ।
देव अवतरला ॥ सौख्याचा सागर-॥४॥

जिकडे तिकडे तेज कोंदलें ।
आनन्दाचे पूर लोटले ।
परि सांगाया कोणी नुरले ।
ब्रह्ममय झाला ॥ सौख्याचा सागर-॥ ५ ॥

संध्यादेवी

[पश्चिम समुद्रकांठचा सायंकाळ यांत वर्णिला आहे.]

चालः—बाळा जो जो रे ॥

पश्चिमदिक्प्रान्तीं । निजविभवीं ।
बसली संध्यादेवी ।
भास्वरवर्णाचा । कनकाचा ।
तल्प तया देवीचा ।
भंवती लखलखती । मश्रूचे ।
पडदे बहु मोलाचे ।

तेथें बैसुनिया । निज तनया ।
बाहतसे रविराया ।
'ये ये सुकुमारा । गगनीं या ।
विश्वाङ्गणिं राङ्गुनिया ।
दिवसां थकलासी । मजपाशीं ।
आतां ये वेगेंसी ।
विश्रान्ती घ्याया । पहुडाया ।
कांचनतल्पावरि या' ।
परिसुनिया ऐसें । मातेचें ।
वच संध्यादेवीचें ।
झेप रवी घाली । वेगेंसी ।
माता घेउनि त्यासी ।

पर्यंकीं निजवी । मग गाणें ।
गाई मंजुळवाणें ।
‘ निज निज रविबाळा । लडिबाळा ।
निद्रा सुख घे विमळा ।
पर्यंकीं रचिली । मृदु शय्या ।
रक्त मेघ घेउनिया ।
गिरद्याही केल्या । मेघांच्या ।
अरुणारुणरंगाच्या ।
अङ्गावरि शेला । जलधीचा ।
नीलवर्ण हा साचा ।
घालुनिया बाळा । मी गाणें ।
गातें मंजुळवाणें ॥
निज निज रविबाळा’– ॥

(मन्दाक्रान्ता.)

गाणें गातां तनय निजला
तेवि सन्ध्या निदेली ।
दिग्दासींनीं असित पडदे
सोडुनी रात्र केली ॥
पृथ्वीपाठीं तम पसरलें
जेंवि हृन्मन्दिरांत ।
दिव्यज्योतिःस्फुरण निमतां
ध्वांत दाटे नितांत ॥

कालचक्राचे फेरे.

चालः—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

कालचक्राचे । फेरे हे गमती साचे ॥ ध्रु० प० ॥

पृथ्वीभंवती हा प्रतिमासीं ।
चन्द्र धांवतो बहुवेगेंसी ।
चन्द्र नव्हे ! नच पृथ्वी तैशी ! ।
कालचक्राचे । फेरे हे गमती—॥ १ ॥

नव ग्रहांचे गोळ धांवती ।
सूर्याभंवती गिरक्या घेती ।
सूर्य नव्हे ! नच ही ग्रहपंक्ति ! ।
कालचक्राचे । फेरे हे गमती—॥ २ ॥

नक्षत्रें हीं अनन्तकोटी।
भिरभिर फिरतीं विश्वापोटीं।
विश्व नव्हे ! नक्षत्रें नच तीं !।
काळचक्राचे। फेरे हे गमती—॥ ३॥

अमावास्येस मध्यरात्रीं अधोभागीं असणाऱ्या सूर्याच्या प्रकाशांत पोहणाऱ्या पृथ्वीच्या पाठीवर जागा झालेला कवि विश्वाङ्गणाच्या एका कोपऱ्यांत उभा राहून पुढील गाणें गात आहे.

रम्य वाटिका.

3/04 ३६०

[चाल—जाउं नका रे विषयाटविची वाट कठिण मोठी ॥

मध्यरात्रिच्या समयीं उठवी
प्रतिभा निजहातें ।
विश्वाङ्गणिंची रम्य वाटिका
दावाया मातें ॥ २ ॥

'ब्रह्मकरंडीं काजळ भरलें
अवस आज, देवी ।
दृग्गोचर तव रम्य वाटिका
व्हावी मज केवीं ?' ॥ ४ ॥

'कैवल्याच्या गगनीं चमके
चिन्मय शशि, बाळा ।
निखिल सृष्टि मम नयनीं दाविल
तुजला लडिवाळा ॥ ६ ॥

विश्वाङ्गण हें पहा पसरलें
तुजपुढतीं बा हें ।
उभा असा तूं दूर राहुनी
नयनीं निज पाहे ॥ ८ ॥

सूर्य नव्हे हा ! कारंजें हें
मणिमय, वेल्हाळा
कुठलीं किरणें ! जलधारा या
उडती बहुसाळा ॥ १० ॥

पृथिवी नच ही ! त्या धारांवरि
निंबू हें नाचें ।
गरगर फिरुनी गमे पारणें
फेडी नयनाचें ॥ १२ ॥

कारंजाच्या सभोंवार बहु
डोलति गुंफा या ।
नीललतांहीं वेष्टित झाल्या
कविगण सुखवाया ॥ १४ ॥

तिथें पल्लवांवरी चमकती
जलबिन्दू पाहे ।
चिन्मयशशिच्या चन्द्रिकेमधें
नच तारे बा हे ! ॥ १६ ॥

प्रभातवायू सुटतां हलविल
पल्लव, जलबिन्दु ।
ढळतिल, तैसा अस्ता जाइल
हा चिन्मय इन्दु ॥ १८ ॥

उष:कालचा वारा जंव नच
सुटला लडिवाळा ।
तंव झोपीं जा. रम्य वाटिका
दिसली ना तुजला ? ॥ २० ॥

ईशलीलेचीं काव्यें

चालः—असा धरि छंद । जेणें तुटेल हा भवबंध ॥

ईशलीलेचीं । काव्यें हीं लिहिलीं साचीं ॥
ध्रु० प० ॥

संध्यासमयीं पश्चिम खुलली ।
अनन्तरङ्गीं चित्रित झाली ।
रंग कशाचे ! संध्या कुठली ! ! ।
ईशलीलेचीं । काव्यें हीं—॥ १ ॥

रात्रिं सरांच्या लहरींवरती ।
दिव्य तारका नर्तन करिती ।
लहरी कुठल्या ! नृत्यें नच तीं ! ! ॥
ईशलीलेचीं । काव्यें हीं—॥ २ ॥

वर्षाकालीं शिखरीवरती ।
निर्झर बहुविध वळणें घेती ।
निर्झर कुठले ! वळणें नच तीं ! ! ।
ईशलीलेचीं । काव्यें हीं —॥ ३ ॥

निजहस्तानें प्रतिभाबाळी ।
चित्रें रेखी कविहृत्पटळीं ।
चित्रें कैचीं ! प्रतिभा कुठली ! ! ॥
ईशलीलेचीं । काव्यें हीं —॥ ४ ॥

प्रतिभेची आरती.

[चालः—आरती ज्ञानराजा ।]

आरती प्रतिभेची ।
आत्मयाच्या कलेची ।
ओवाळिति कविराज ।
काय शोभा वर्णु तीची ॥ ध्रु० प० ॥

आकाशाचें ताट केलें ।
तेथें तारे दीप झाले ।
आरती ओवाळाया ।
चैतन्यानें उजळीले ॥ आरती—॥ १ ॥

तिचि सृष्टि अन्तराळीं ।
दिव्य तेजें प्रकाशली ।
प्राकृतां रंजवाया ।
शब्दरूपें प्रकटली । आरती—॥ २ ॥

व्यासादिक कवि थोर ।
नम्र तीच्या समोर ।
कुवलयानंद त्यांच्या ।
दीन पायींचा किंकर ॥ आरती—॥ ३ ॥

उल्लेख.

गाणें.	कडवें	
३	१	मज–काव्यात्म्यास.
८	७	सरस्वती–कुवलयानंदाची आई; पक्षीं वाग्देवी.

REFBK-0001463
REFBK-0001463
१४६२